# शिल्लक फटाका स्टॉल्स विक्रीसाठी भाडयाने देणेबाबत जाहीर निवेदन

**''पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या तक्ता ब मधिल नमुद बोली न लागलेल्या रिकाम्या जागा भाडयाने देणेचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे. यानुसार** दि १/१०/२४ व दि ०३/१०/२४ रोजी राबविण्यात आलेल्या ऑनलाईन लिलाव प्रक्रिया व दि ०७/१०/२४ व दि ०८/१०/२४ रोजी राबविण्यात आलेल्या ऑनलाईन फेरलिलाव प्रक्रिया दरम्यान ज्या स्टॉल्स वर कोणीही बोली लावली नाही असे वाटप न झालेल्या एकुण ६३ स्टॉलपैकी **धानोरी स.नं. १६/३ अ** येथील एकुण ५ पैकी ३ स्टॉल्स व **खराडी स.नं. १२ येथील** एकुण ४० स्टॉल्स पैकी १ असे एकुण ४ स्टॉल शिल्लक आहे. अशा बोली न लावलेल्या शिल्लक ४ स्टॉल्स करीता ईच्छुक स्टॉल धारकाचे अर्ज प्राप्त झाल्यास अशा अर्जदारास **त्या भागातील सर्वाधिक बोली लावलेल्या स्टॉल च्या दराने स्टॉल्स चे वाटप करणेस** व वाटपपत्र देणेस व क**ोंढवा खुर्द स.नं.४** येथिल एकुण ९ स्टॉल पैकी ९ शिल्लक, **कोथरूड स.नं.५४/४** येथिल ५ पैकी ५ शिल्लक, **पर्वती स.नं.९३ सह्याद्री मैदान** येथिल ५ पैकी ५ शिल्लक, **धायरी स.नं. १४४/४** येथिल ५ पैकी ५ शिल्लक , **बालेवाडी स.न १७** येथिल १० पैकी १० शिल्लक, **हडपसर स.नं. १३७ येथिल** ५ पैकी ५ शिल्लक, **वारजे स. न. १११/१** येथिल २० पैकी २० शिल्लक असे एकुण ५९ स्टॉल शिल्लक आहेत असे एकही बोली न लागलेल्या भागातील एकुण ५९ स्टॉल करीता **त्या भागातील मान्य भाडे दराने त्या स्टॉल्स ची अनामत रक्कम व स्टॉल चे भाडे भरून घेवुन स्टॉल्स चे वाटप करणेस** व वाटपपत्र देणेस मा महापालिका आयुक्त यांची ठराव क्र ६/७६० दि १०/१०/२०२४ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे. **त्यासाठीच्या उपलब्ध जागांची माहिती, अटी, शर्ती व इतर तपशील पुणे महानगरपालिकेच्या pmc.gov.in या संकेतस्थळावर** दि १२/१०/२०२४ पासून पाहण्यास **उपलब्ध आहे.** .

त्याकरीता इच्छुकांना **तक्ता ब** येथील ठिकाणच्या स्टॉलकरीता आवश्यक माहिती मालमत्ता व व्यवस्थापन विभाग, पुणे म.न.पा. भवन येथुन उपलब्ध होईल. त्याबाबतचे जाहीर निवेदन दि. **१२/१०/२०२४** रोजीच्या दैनिक सकाळा व महाराष्ट्र टाईम्स या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

कळावे,

## जागांची माहिती तक्ता 'ब'

| अक्र | पुणे मनपा फटाका स्टॉल नियोजित जागा | नियोजित स्टॉल संख्या | बोली न लागलेले शिल्लक स्टॉल | निर्धारीत एकवट भाडे रक्कम दि.२०/१०/२४ ते दि. ०३/११/२४ प्रति स्टॉल + GST १८% | अनामत रक्कम प्रति स्टॉल | सफाई शुल्क प्रति स्टॉल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय -कोंढवा खुर्द स.नं.४ पार्क आरक्षणापैकी जागा (फायर स्टेशनच्या मागील) | ९ | **९** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| २ | येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रिय कार्यालय- धानोरी स.नं. १६/३ अ ॲमेनिटी स्पेस जागा | ५ | **३** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| ३ | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय -कोथरूड स.नं.५४/४, ओटा मार्केट आरक्षणापैकी जागा | ५ | **५** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| ४ | धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय -पर्वती स.नं.९३ सह्याद्री मैदान, लक्ष्मीनगर | ५ | **५** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| ५ | सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय- धायरी स.नं. १४४/४, यशवंत विहार सोसायटी,धायरी, ॲमेनिटी स्पेस ९४५ चौ.मी. | ५ | **५** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| ६ | नगर रोड - वडगाव शेरी क्षेत्रिय कार्यालय -खराडी स.नं. १२ (सदर जागा क्रीडा विभागाच्या ताब्यात असल्याने क्रीडा विभागाच्या अभिप्रायास अधीन राहून जागा देण्यात येईल.) | ४० | **१** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| ७ | औंध- बाणेर क्षेत्रिय कार्यालय बालेवाडी स.नं. १७ | १० | **१०** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| ८ | हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालय हडपसर- स.नं. १३७ मोहन धारिया उद्याना समोर, सिजन मॉल जवळ | ५ | **५** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| ९ | **वारजे कर्वेनगर** क्षेत्रिय कार्यालय **-स. न. १११/१** | २० | **२०** | १३,२०० | ३००००/- | १०००/- |
| | | १९४ | **६३** | | | |

## अटी व शर्ती :-

१. मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत फटाका विक्री स्टॉलकरीता पोलीस विभाग, अग्निशमन विभाग व परवाना व आकाशचिन्ह विभागाच्या अभिप्रायानुसार फटाका विक्री व्यवसायिकांना ऑनलाईन लिलाव पद्धती राबवून रिकामी जागा उपलब्ध करून द्यावयाची आहे.

२. अर्जासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड स्कॅन करून जोडावे. व्यवसायाच्या दृष्टीने आवश्यक ते परवाने घेण्याची जबाबदारी संबंधीत बोलीधारकाची राहील.

३. वर्तक उद्यान,शनिवार पेठ येथील फटका स्टॉल साठी अनामत र.रू. ५०,०००/- असेल उर्वरित स्टॉल करीता उपरोक्त तक्त्यातील रिकाम्या जागांसाठी अनामत र.रू. ३०,०००/- पुणे म.न.पा. कोषागारात भरून घेणेत येईल.

४. यशस्वी गाळेधारकाने विनाविलंब पुणे मनपाने जाहीर केलेल्या दिनांकापूर्वी विहीत भाडे पुणे म.न.पा. कोषागारात जमा करणे. त्यानंतर आवश्यक अटी व शर्तींची पुर्तता केल्यानंतर संबंधीतांना १५'X१०' मापाचे स्टॉलसाठी रिकाम्या जागेचे वाटप करण्यात येईल व त्या अनुषंगाने वाटप पत्र देण्यात येईल.

५. पुणे म.न.पा. कडून फक्त मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. स्टॉलचे तात्पुरत्या स्वरूपाचे सुरक्षित बांधकाम पात्र गाळेधारकाने स्वखर्चाने करावयाचे आहे व कालावधी संपल्यानंतर काढून घ्यावयाचे आहे.

६. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील नियमावली लागू राहील.

७. साथ प्रतिबंधक अधिनियम १८९७ मधील नियमावली व वेळोवेळी मे. शासनाने निर्गमित केलेले ओदश लागू असतील.

८. मे. महाराष्ट्र शासन यांचेकडील वेळोवेळी जारी केलेल्या अधिसुचना लागू राहील.

९. फटाका विक्रीची वेळ मे. शासनाने व पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार असेल.

१०. परवानगी पत्रासोबत अग्निशमन विभागाकडील ना-हरकत पत्र, पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा यांचेकडील ना-हरकत पत्र (वर्तक बागेसाठी) आणि पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. १ यांचेकडील ना-हरकत पत्रे जोडली आहेत. सदर ना-हरकत पत्रामधील सर्व अटी व शर्ती गाळेधारकांवर बंधनकारक राहतील.

११. यशस्वी गाळेधारकांनी विहीत नमुन्यांतील हमीपत्र र.रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड करू देणे आवश्यक आहे.

१२. नागरिकांनी फटाके घेण्यासाठी सुरक्षित अंतरे ठेवणेकरीता स्टॉलधारकांनी बांबूचे रेलिंग, बॅरेकेटींग करणे आवश्यक राहील.

१३. अग्निशमन विभाग यांचेकडील अटी शर्तीची पुर्तता करणेकरीता नजीक असलेल्या अग्निशमन केंद्र प्रमुखास जागा दाखवून त्यांचे सुचनेनुसार अग्निशमन यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. अशा ठिकाणां कोणताही अपघात, हानी व दुखापत झाल्यास तसेच शेजारील इमारतीस अगर मालमत्तेस धोका पोहोचल्यास त्याची सर्व जबाबदारी गाळेधारकाची राहील. याबाबत पुणे मनपास कोणतीही तोषीस असणार नाही.

१४. गाळे उभारण्यात आलेल्या परिसराची स्वच्छता करणेची/राखणेची जबाबदारी सर्व गाळेधारकांची राहील. संबंधीत आरोग्य निरीक्षकास अस्वच्छता आढळल्यास दंडात्मक कारवाई करून अनामत रकमेमधून सदर दंडाची रक्कम वजा करून घेण्यात येईल.

१५. स्टॉल विक्रीची मुदत संपल्यानंतर २ दिवसाचे आंत स्वखर्चाने सदरचे तात्पुरत्या स्वरूपातील गाळयाचे बांधकाम जागेवरून ताबडतोब हटवून जागा स्वच्छ करून रिकामी करून देणे. तसेच सदरच्या जागेचे

कोणतेही नुकसान झालेले नाही याची खात्री गाळेधारकाने करून देणे आवश्यक राहील.

१६. परवानगी दिलेल्या जागेची पुणे महानगरपालिकेस जरूरी भासल्यास अथवा त्या जागेबाबत वाद विवाद निर्माण झाल्यास सदर देण्यात आलेली अधिकृत परवानगी २४ तासाची पुर्वसुचना देवून रद्द करण्याचा महानगरपालिकेस हक्क राहील.

१७. फटाका विक्रीच्या दोन गाळयांमध्ये ३ मी. अंतर असले पाहीजे. असे स्टॉल हे मुख्य रस्त्यापासून अथवा अन्य आस्थापनांपासून किमान १० मी. दूर अंतरावर असणे आवश्यक आहे.

१८. सदर फटाका विक्री स्टॉल हा अज्वलनशील साहित्यापासून तयार केलेल्या शेडमध्ये असावा. अनधिकृत व्यक्तीसाठी प्रवेश निषिद्ध असेल अशा पद्धतीने सर्व बाजुने बंदीस्त असावा.

१९. असे स्टॉल हे एकमेकांकडे तोंड करून उभारले जाऊ नयेत.

२०. अशा स्टॉलमध्ये वा दोन स्टॉलमधील सुरक्षित अंतरामध्ये तेलाचे, गॅसचे किंवा उघड्या वातींचे दिवे लावू नयेत. विद्युत दिव्यांचा वापर करताना असे दिवे हे भिंतीवर किंवा छतास फिक्स करून लावण्यात यावेत. तसेच त्यासाठीचे वायरिंग हे बंदीस्त पाईपमधून असावे. विद्युत प्रवाह चालू अथवा बंद करणेसाठी स्टॉलच्या भिंतीवर स्वीच फिक्स केलेला असावा. तसेच एकाच लाईनमधील सर्व स्टॉलचा मुख्य स्वीच स्वतंत्रपणे असावा.

२१. स्टॉलपासून ५० मी. अंतरामध्ये कोणत्याही प्रकारच्या फटाका किंवा शोभेच्या दारूची चाचणी करू नये.

२२. एका ठिकाणी एका व्यक्तीस एकाच गाळयाचे वाटप करणेत येईल.

२३. मालमत्ता व व्यवस्थापन विभाग यांचेशी संपर्क साधण्यासाठीची यादी परवाना पत्रासोबत देण्यात येईल. तसेच ऑफलाईन पद्धतीने अनामत रक्कम जमा करणेसाठी पुणे महानगरपालिकेची मनपा मुख्य इमारतीमधील मालमत्ता व व्यवस्थापन विभाग येथे तजवीज करण्यात आली आहे.
शिल्लक स्टॉल्स ची माहिती www.pmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२४. अनामत रक्कम ऑनलाईन/ऑफलाईन जमा करणेसाठी कर्मचाऱ्यांचे नाव व संपर्क क्रमांक
१. श्रीमती दर्शना पावडे मोबा. क्र. ७०३०४४२५३०, २. श्रीमती विजया राठोड, मोबा क्र. ९६८९९३१५१५ ३. श्री. रूपेश आल्हाट, मोबा. क्र. ९६८९९३१६८५

२५. अनामत रकमेचे चलन ऑफलाईन पद्धतीने देण्यात येईल. इच्छुक स्टॉल धारक यांना आवश्यक असलेल्या स्टॉल चे मागणीपत्रक दि १८/१०/२०२४ रोजी दु.४.०० वाजेपर्यंत जमा अनामत रक्कमेच्या चलन + इच्छुक स्टॉल चे भाडे रक्कम + सफाई शुल्क इ. रक्कमेसह तसेच सोबत जोडलेले हमीपत्र मालमत्ता व्यवस्थापन विभाग येथे जमा करणे बंधनकारक राहील. तद्नंतर अर्ज स्वीकृत करण्यात येणार नाही .

२६. अटी, शर्ती व इतर कोणत्याही बाबीबाबत संदिग्धता आढळल्यास त्याबाबतचे अंतिम अधिकार मा. अति. महापालिका आयुक्त (वि) यांना असतील.

# हमीपत्र

सन २०२४ च्या दिवाळी सणानिमित्त मी पुणे महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या मोकळ्या जागेवरील पत्ता ......................................... येथील फटाका विक्रीसाठी स्टॉल स्टॉल क्र. ....... दि.२०/१०/२०२४ ते दि. ०३/११/२०२४ या कालावधीत उभारणार आहे. त्यासाठी अग्निशमन अधिकारी व पोलिस उप आयुक्त परिमंडळ क्र. ..... यांनी दिलेल्या खालील अटी मला मान्य असून सदर अटींचे मी नियमितपणे पालन करेन व आकाशचिन्ह परवाना विभाग पुणे म.न.पा. व पोलीस विभाग यांचेकडील वैयक्तिक परवानगी घेण्याची जबाबदारी ही माझी राहील. तसेच खालील अटींचे पालन न केल्यास होणाऱ्या वित्त व जीवित हानीची जबाबदारी सर्वस्वी माझ्यावर राहील. याबाबत दुर्घटना झाल्यास मी वैयक्तिक जबाबदार आहोत. पुणे मनपास त्याची कोणत्याही प्रकारे तोषिस लागू देणार नाही. याबाबत सदर हमीपत्र देत आहे.

**मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडील अटी खालीलप्रमाणे.**

१) सदर ठिकाणी मा. संयुक्त विस्फोटक नियंत्रक यांच्याकडे पत्र क्रमांक ई-२(ए) इएक्सपीएलजिईएन दिनांक ०२/०९/२००५ व त्यासोबत ची अधिसूचना क्र. जीएसआर ६८७ (ई)दि.२७ ०९/१९८४/मधील सूचनांचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्याकडून शोभेच्या दारूचा साठा व विक्रीसाठी घालून दिलेल्या नियमांचे पालन होणे आवश्यक आहे.

२) दोन स्टॉलमध्ये तीन मीटर अंतर ठेवून स्टॉलची उभारणी करण्यात यावी अन्यथा सदर बाबीस स्टॉल धारक जबाबदार असतील .

३) सदर ठिकाणी विक्रीसाठी ठेवण्यात येणारे फटाके हे स्टॉलचे आत मध्ये ठेवण्यात यावे स्टॉलचे बाहेर बाजूस अथवा मागील बाजूस त्याच्या साठा करू नये.

४) फटाका विक्रीचे स्टॉल जवळ फटाक्याचे परिक्षण करू नये.

५) फटाका स्टोल असेपर्यत सदर ठिकाणावरून होणारी नियमित वाहतूकीस पर्यायी मार्गाने वळविण्यात यावी.

६) सदर ठिकाणी येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे पार्किंग साठीची व्यवस्था ही सदर स्टॉल पासून किमान पाचशे मीटर दूर अंतरावर असेल. जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत संभाव्य धोका टाळणे शक्य होईल तसेच अग्निशमन कार्यामध्ये कोणतीही अडथळा येणार नाही.

७) आग प्रतिबंधक दृष्टीने सदर ठिकाणचे प्रत्येक स्टॉलवर किमान ४ नग९ लिटर क्षमतेचे वॉटर सीओटू टाईप फायर एक्सटिंग्विशर्सव ०२ नग ५ कि. ग्रा. क्षमतेचे एबीसी टाईप

फायर एक्सटिंग्विशर्र्स सुरक्षित व त्वरित उपलब्ध होतील अशा दर्शनी ठिकाणी त्याचा वापर करण्याचे ज्ञान तेथील कर्मचाऱ्यांना असावे.

८) पुणे शहरांमध्ये वेगवेगळ्या मोकळ्या जागेवर क्रीडांगणे या ठिकाणी लावण्यात आलेल्या मोठ्या प्रमाणातील फटाका स्टॉल लाती व्र मनुष्य बळाअभावी अग्निशमन वाहने पुरविणे अडचणीचे आहे असे यापूर्वी कळविण्यात आलेले होते माननीय धोरणान्वये फटाका स्टॉल धारकांनी स्वतंत्र प्रशिक्षित मनुष्यबळासह आपापल्या फटाका स्टॉल साठी स्वातंत्रपणे अग्नि सुरक्षा व्यवस्था करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे .

९) अत्यंतिक प्रसंगी कसबा पेठ अग्निशमन केंद्राचा दूरध्वनी क्रमांक ०२०-२४५७८९५० असून अग्नीशमण मुख्यालयाचा दूरध्वनी क्रमांक १०१ किंवा ०२०-२६४५१७०७ वर संपर्क साधावा.

१०) सदरील अभिप्राय हा आग प्रतिबंधक उपाययोजनांच्या दृष्टीने देण्यात येत असून वरीलपैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास सदरचा अभिप्राय तात्काळ रद्द समजण्यात येईल.

११) सदर ठिकाणी स्टॉल उभारणाऱ्या व्यवसायिकाने फटाका व शोभेची दारू विक्रीसाठी त्याचे नावाचे स्वतंत्रपणे अग्निशमन दलाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

## पोलिस उप आयुक्त परिमंडळ क्र. १/२/३/४ यांचेकडील अटी खालीलप्रमाणे.

१) उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक स्टॉलमध्ये किमान दहा फुटचे अंतर असावे.

२) संबंधित जागेवरील प्रत्येक फटाका स्टॉल हा अधिकृत परवानाधारक असला पाहिजे.

३) सदर ठिकाणी आग लागू नये याची दक्षता घेण्यात यावी.

४) स्टॉल उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक स्टॉलचे ठिकाण आग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी.

५) स्टॉल धारक मार्फत सदर ठिकाणी दिवस रात्र देखरेख करण्यात यावी.

६) नियोजित फटाका स्टॉलचे जागेपासून ५० मीटरचे अंतरावर वाहन उभी करण्यात सक्त मनाई असल्याने ५० मीटरचे अंतरापर्यंत वाहने उभे राहणार नाहीत याची खात्री करावी व तशीच पार्किंगची व्यवस्था करावी.

७) अग्निशामक दलाची गाडी प्रत्येक स्टॉलचे ठिकाणापर्यंत सहज पोहचू शकेल अशी व्यवस्था करावी.

८) फटाका स्टॉलचे जागेमध्ये ऑइल,पेट्रोल,ॲसिड इतर कोणताही ज्वालाग्रही पदार्थ ठेवला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

९) फटाका स्टॉल परिसरात कोणत्याही खाद्यपदार्थ विक्रीचा स्टॉल असू नये तसेच तेथे बिडी, सिगरेट विक्रीच्या टपऱ्या असू नयेत.

१०) सदर ठिकाणी ॲम्बुलन्स व फायरब्रिगेड वाहनांचे तास व्यवस्था असावी २४

११) स्टॉल धारकाने पार्किंगची व्यवस्था पुणे महानगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेत ग्राहकाकडून पार्किंगधारकाने करणे बंधनकारक आहे

१२) नियोजित फटाका स्टॉलचे ठिकाणीच स्टॉलची उभारणी करण्यात यावी.

**मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील अटी खालीलप्रमाणे.**

१. पुणे म.न.पा. कडून फक्त मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. स्टॉलचे तात्पुरत्या स्वरूपाचे सुरक्षित बांधकाम पात्र गाळेधारकाने स्वखर्चाने करावयाचे आहे व कालावधी संपल्यानंतर काढून घ्यावयाचे आहे.

२. फटाका विक्रीची वेळ मे. शासनाने व पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार असेल.

३. परवानगी पत्रासोबत अग्निशमन विभागाकडील ना-हरकत पत्र, पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा यांचेकडील ना-हरकत पत्र (वर्तक बागेसाठी) आणि पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. १ यांचेकडील ना-हरकत पत्रे जोडली आहेत. सदर ना-हरकत पत्रामधील सर्व अटी व शर्ती गाळेधारकांवर बंधनकारक राहतील.

४. नागरिकांनी फटाके घेण्यासाठी सुरक्षित अंतरे ठेवणेकरीता स्टॉलधारकांनी बांबूचे रेलिंग, बॅरेकेटींग करणे आवश्यक राहील.

४. अग्निशमन विभाग यांचेकडील अटी शर्तींची पुर्तता करणेकरीता नजीक असलेल्या अग्निशमन केंद्र प्रमुखास जागा दाखवून त्यांचे सुचनेनुसार अग्निशमन यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. अशा ठिकाणांवर कोणताही अपघात, हानी व दुखापत झाल्यास तसेच शेजारील इमारतीस अगर मालमत्तेस धोका पोहोचल्यास त्याची सर्व जबाबदारी गाळेधारकाची राहील. याबाबत पुणे मनपास कोणतीही तोषीस असणार नाही.

६. गाळे उभारण्यात आलेल्या परिसराची स्वच्छता करणेची/राखणेची जबाबदारी सर्व गाळेधारकांची राहील. संबंधीत आरोग्य निरीक्षकास अस्वच्छता आढळल्यास दंडात्मक कारवाई करून अनामत रकमेमधून सदर दंडाची रक्कम वजा करून घेण्यात येईल.

७. स्टॉल विक्रीची मुदत संपल्यानंतर २ दिवसाचे आंत स्वखर्चाने सदरचे तात्पुरत्या स्वरूपातील गाळयाचे बांधकाम जागेवरून ताबडतोब हटवून जागा स्वच्छ करून रिकामी करून देणे. तसेच सदरच्या जागेचे कोणतेही नुकसान झालेले नाही याची खात्री गाळेधारकाने करून देणे आवश्यक राहील.

८. परवानगी दिलेल्या जागेची पुणे महानगरपालिकेस जरूरी भासल्यास अथवा त्या जागेबाबत वाद विवाद निर्माण झाल्यास सदर देण्यात आलेली अधिकृत परवानगी २४ तासाची पुर्वसुचना देवून रद्द करण्याचा महानगरपालिकेस हक्क राहील.

९. फटाका विक्रीच्या दोन गाळयांमध्ये ३ मी. अंतर असले पाहीजे. असे स्टॉल हे मुख्य रस्त्यापासून अथवा अन्य आस्थापनांपासून किमान १० मी. दूर अंतरावर असणे आवश्यक आहे.

१०. सदर फटाका विक्री स्टॉल हा अज्वलनशील साहित्यापासून तयार केलेल्या शेडमध्ये असावा. अनधिकृत व्यक्तीसाठी प्रवेश निषिद्ध असेल अशा पद्धतीने सर्व बाजुने बंदीस्त असावा.

११. असे स्टॉल हे एकमेकांकडे तोंड करून उभारले जाऊ नयेत.

१२. अशा स्टॉलमध्ये वा दोन स्टॉलमधील सुरक्षित अंतरामध्ये तेलाचे, गॅसचे किंवा उघड्या वातींचे दिवे लावू नयेत. विद्युत दिव्यांचा वापर करताना असे दिवे हे भितीवर किंवा छतास फिक्स करून लावण्यात यावेत. तसेच त्यासाठीचे वायरिंग हे बंदीस्त पाईपमधून असावे. विद्युत प्रवाह चालू अथवा बंद करणेसाठी स्टॉलच्या भितीवर स्वीच फिक्स केलेला असावा. तसेच एकाच लाईनमधील सर्व स्टॉलचा मुख्य स्वीच स्वतंत्रपणे असावा.

१३. स्टॉलपासून ५० मी. अंतरामध्ये कोणत्याही प्रकारच्या फटाका किंवा शोभेच्या दारूची चाचणी करू नये.

१४. अटी, शर्ती व इतर कोणत्याही बाबीबाबत संदिग्धता आढळल्यास त्याबाबतचे अंतिम अधिकार मा. अति. महापालिका आयुक्त (वि) यांना असतील.

वरील अटींचे मी अवलोकन केले आहे. त्या नुसार सदर अटींचे पालन करणे तसेच वेळोवेळी पुणे महानगरपालिका, पोलीस विभाग व शासना मार्फत जारी केलेल्या आदेशांचे पालन करणेची व्यक्तीशः जबाबदारी माझी राहील. याबाबत हे हमीपत्र देत आहे.

हमीपत्र देणाऱ्याची स्वाक्षरी

फोटो

नाव -

आधार क्र. -

पत्ता -

मो.नं.-

**उप आयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन**
कार्यालय, पुणे महानगरपालिका

## फटाका विक्री स्टॉलसाठी अर्जदारांनी भरावयाची माहिती

| | |
|---|---|
| अर्जदाराचे नाव | |
| पत्ता | |
| मोबाईल नंबर | |
| ई–मेल आयडी | |
| पॅन कार्ड नंबर | |
| आधार कार्ड नंबर | |
| स्टॉलचे मागणी ठिकाण | |
| अनामत रक्कम रू. | |
| चलन क्रमांक | |

स्वाक्षरी :–

दिनांक :–

पॅन कार्ड व आधार कार्ड झेरॉक्स प्रत देणे.